
# मोजमापे-५




रामूच्या आईने रामूला दूध आणायला सांगितले. रामूची बहीण लहान आहे. तिने रामूला पिशवी दिली.
रामू म्हणाला, "पिशवीत दूध कसे आणणार? चहाची पत्ती. साखर कागदाच्या पुडीत पिशवीत ठेवता येतात. दूध कसे ठेवायचे पिशवीत?"


पाणी, दूध, चहा, वरण, गोडेतेल हे सगळे पातळ पदार्थ आहेत. ते भांड्यातच ठेवावे लागतात.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४०००0५.
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, (विद्याभारती) पुणे - ४११ ०२९.

कोपऱ्यात दोन भांडी ठेवलेली होती.




हे भांडे बुटके आहे
पण रुंद आहे.



हे भांडे अरुंद आहे पण उंच आहे.


कोणत्या भांड्यात जास्त दूध मावेल?



कोणते भांडे मोठे हे कसे ठरवायचे?
रामूने युक्ती केली.
एक भांडे पाण्याने काठोकाठ भरले. ते दुसऱ्या भांड्यात ओतले.
कोणते भांडे मोठे आहे हे रामूने कसे ओळखले? तुम्ही सांगा पाहू —

रामूचे बाबा रामूची युक्ती पाहत होते. रामूच्या बाबांनी एक गंमत केली. बाबा म्हणाले. "ही भांडी हलवायची नाहीत. कोणते भांडे मोठे हे आता कसे ठरवणार?"

रामू विचार करू लागला—




गवळी दूध कसे घालतो?
रामूने कप घेतला. पसरट भांड्यात कपाने पाणी भरायला सुरुवात केली. ३० कप पाणी मावले. त्याच कपाने आता उंच भांड्यात पाणी ओतले. भांडे काठोकाठ भरण्यासाठी ३० कप पाणी लागले.

रामूच्या बाबांनी रामूला शाबासकी दिली.

## तुम्हीसुध्दा हे करून पहा—

चित्रात दाखविलेल्या वस्तू घ्या. एकेका भांड्यात किती कप पाणी मावते ते पहा.



पेल्यात ३ कप पाणी मावते.
पातेल्यात १० पेले पाणी मावते.
त्या पातेल्यात किती कप पाणी मावेल ?